**"जुलै २०१७" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...**

**(क) शासन निर्णय / अधिसूचना**

- दिनांक ७ जुलै २०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्यात लागू असलेली धोरणे योजना व कार्यक्रम यांचे नियमित मुल्यमापन करणे, धोरणात्मक परिक्षणासाठी धोरण संशोधन करणे, धोरणात्मक पर्यायांचा तौलनिक अभ्यास करुन सर्वाधिक उपयुक्त पर्याय सुचविणे आणि प्रशिक्षणाव्दारे प्रशासकीय सुधारणांना चालना देण्यासाठी जागतिक मानांकनाची महाराष्ट्र धोरण संशोधन संस्था यशदा, पुणे या शिखर प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून स्थापन करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.

- "One week in service training programme for the year 2017-18 for AIS officers (IAS, IPS and IFoS officers working under the central staffing scheme and central secretariat service (CSS) and ecentral secretariat Stenographer Service (CSSS) officers" या विषयाबाबतचे केंद्र शासनाच्या कार्मिक व लोक तक्रारी व निवृत्तीवेतन मंत्रालयाचे D..No.१२०१७/०२/२०१७-TNP(S), दिनांक १९ जून २०१७ चे पत्र या विभागाच्या दिनांक ५ जुलै २०१७ च्या पत्रान्वये महाराष्ट्र संवर्गातील सर्व भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांच्या माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित करण्यात आले आहे.

- दिनांक १ जुलै २०१७ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) साठी बाह्य यंत्रणेकडून मासिक दराने वाहनचालक पुरविण्यासाठी दिनांक १ जुलै २०१७ ते ३० जून २०१८ या कालावधीसाठी दर करार निश्चित करण्यात आले आहे. यासाठी मे.क्रिष्णा मोटर्स, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई या संस्थेस वाहनचालक पुरवठेदार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

- दिनांक १२ जुलै २०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील शासकीय / निमशासकीय / महामंडळातील अधिकारी / कर्मचारी यांच्यासाठी अनुकंपा धोरण सुधारणे आणि त्याचबरोबर प्रकल्पग्रस्तांना शासकीय नोकऱ्यांमध्ये भरती करण्यासंबंधी आढावा घेणे व त्यानुषंगाने प्रभावी उपाययोजना सुचविण्यासाठी मा.मंत्री (वित्त) यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमितीस अहवाल सादर करण्यास दिनांक ३० नोव्हेंबर २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

- दिनांक १२ जुलै २०१७ च्या शासन शुद्धीपत्रान्वये "राज्य सेवा परीक्षव्दारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत गट-अ व गट-ब पदासाठी निवड करण्यात आलेल्या उमेदवारास प्रशिक्षण कार्यक्रमासाठी त्याच्या एकूण निवड प्रक्रियेमध्ये एक वर्षासाठी मुदतवाढ घेण्याची केवळ एक संधी देण्यात येईल. त्यानुसार उमेदवारांनी प्रशिक्षण कार्यक्रमासाठी मुदतवाढ घेण्यासाठी शासनाकडे अर्ज सादर करतान, यापूर्वी एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत अंतर्भूत असणाऱ्या अन्य कोणत्याही पदावरील निवड प्रक्रियेसाठी मुदतवाढ घेण्यात आली नाही असे नमूद करणे बंधनकारक राहिल," अशी तरतूद करण्यात आली आहे.

- दिनांक ११ जुलै २०१७ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) साठी लागणारे कार्यालयीन साहित्य पुरविण्याकरिता दिनांक १ जुलै २०१७ ते ३० जून २०१८ या कालावधीसाठी दर करार निश्चित करण्यात आले आहे. यासाठी मे.झमझम एंटरप्राईझेस, फोर्ट, मुंबई या संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे.

- दिनांक ११ जुलै २०१७ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) साठी लागणारे संगणकीय साहित्य पुरविण्याकरिता दिनांक १ जुलै २०१७ ते ३० जून २०१८ या कालावधीसाठी दर करार निश्चित करण्यात आले आहे. यासाठी मे.शुभम इन्फोटेक, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई या संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे.

- दिनांक ११ जुलै २०१७ च्या शासन ज्ञापनान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने लिपिक-टंकलेखक (मराठी / इंग्रजी) परीक्षा २०१५ या गुणवत्ता यादीतून शिफारस केलेल्या उमेदवाराचे बृहन्मुंबईतील राज्य शासनाच्या कार्यालयातील लिपिक-टंकलेखक पदावर १ उमेदवाराचे फेरनियतवाटप करण्यात आले आहे.

- दिनांक ११ जुलै २०१७ च्या शासन ज्ञापनान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने लिपिक-टंकलेखक (मराठी / इंग्रजी) परीक्षा २०१५ च्या प्रतिक्षा यादीतून शिफारस केलेल्या उमेदवारांचे बृहन्मुंबईतील राज्य शासनाच्या विविध कार्यालयातील लिपिक-टंकलेखक पदावर १२ उमेदवारांचे फेरनियतवाटप करण्यात आले आहे.

- सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील मंत्रालय उपाहारगृह, चौरस आहारगृह, विभानभवन उपाहागृह तसेच कोकणभवन उपाहारगृह या चारही आहारगृह / उपाहारगृहामधील रिक्त पदे तसेच तात्पुरती पदे बाह्ययंत्रणेव्दारे भरण्यासाठी मागविण्यात येणाऱ्या निविदेतील निविदाकाराची निवड करण्यासाठी उपसचिव / सहसचिव (उपाहागृहे), सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे.

- "One week in service training programme for the year 2017-18 Reschedule of 2 proagammes." या विषयाबाबतचे केंद्र शासनाच्या कार्मिक व लोक तक्रारी व निवृत्तीवेतन मंत्रालयाचे D.O.No.१२०१७/०२/२०१७-TNP(S), दिनांक १२ जुलै २०१७ चे पत्र या विभागाच्या दिनांक २९ जुलै २०१७ च्या पत्रान्वये महाराष्ट्र संवर्गातील सर्व भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांच्या माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित करण्यात आले आहे.

- दिनांक २९ जुलै २०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्यसेवा (मुख्य) परीक्षा २०१५ व २०१६ च्या अंतिम निकालाच्या आधारावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून निवड झालेल्या मंत्रालयीन कक्ष अधिकारी, गट-ब संवर्गातील उमेदवारांच्या परिविक्षाधीन प्रशिक्षण (सीपीटीपी-४) कालावधीकरिता ३२ अधिसंख्य पदे निर्माण करण्यात आली आहेत.

- दिनांक २७ जुलै २०१७ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील आहार / उपाहारगृहांच्या कार्यन्विततेसाठी लागणारा कच्चा माल / वस्तू / साहित्य इत्यादींच्या खरेदीसाठी दिनांक १ जुलै २०१७ ते ३० जून २०१८ या कालावधीसाठी विविध १६ निविदाकारांच्या निम्नस्तर निविदा स्वीकृत करण्यास उपाहारगृह समितीने मान्यता दिली आहे.

- दिनांक २७ जुलै २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये राज्यसेवा परीक्षा २०१६ च्या अंतिम निकालाच्या आधारे शिफारसप्राप्त ठरलेल्या गट-अ व गट-ब मधील उमेदवारांच्या प्रशिक्षणासाठीचा एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-४ संबंधातील विविध मुद्यांबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.

**(ख) <u>प्रशिक्षण / विभागीय परीक्षा</u>**

- दिनांक ७ जुलै २०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्यसेवा (मुख्य) परीक्षा २०१४ व २०१५ च्या अंतिम निकालाच्या आधारावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून निवड झालेल्या मंत्रालयीन कक्ष अधिकारी, गट-ब संवर्गातील उमेदवारांच्या एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम सीपीटीपी-३ अंतर्गत सामान्य प्रशासन विभागाच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात आलेल्या ३८ अधिसंख्य पदांपैकी २२ अधिसंख्य पदे रद्द करण्यात आली आहेत.

- दिनांक ४ जुलै २०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्य प्रशिक्षण धोरणानुसार प्रशासकीय प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याकरिता घोषित करण्यात आलेल्या महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी (मेटा), नाशिक / महाराष्ट्र जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी), औरंगाबाद / वाहतूक प्रशिक्षण संस्था, भायखळा, बृहन्मुंबई या तीन प्रशिक्षण संस्थांचा "जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था" म्हणून दर्जा रद्द करण्यात आला आहे. तसेच महसूल व वन विभागाच्या अधिनस्त "मराठवाडा महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी, औरंगाबाद या संस्थेस "जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था" म्हणून घोषित करण्यात आले आहे.
- दिनांक ३ जुलै २०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्य सेवा परीक्षेव्दारे शिफारसपात्र उमेदवारांना एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम प्रशिक्षणास रुजू होण्यासाठी द्यावयाच्या मुदतवाढीचे निकष निश्चित करण्यात आले.

- दिनांक ३ जुलै २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये सहायक कक्ष अधिकारी यांच्या कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी तसेच नामनिर्देशनाने नियुक्त झालेल्या कक्ष अधिकाऱ्यांसाठी सन २०१७ मध्ये घ्यावयाच्या विभागीय परीक्षेच्या प्रशिक्षण परीक्षेसाठी दिनांक ३ ऑगस्ट २०१७ पर्यंत अर्ज पाठविण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

- दिनांक १ जुलै २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये सहायक कक्ष अधिकारी सेवाप्रवेशात्तर प्रशिक्षण परीक्षा २०१७ या परीक्षेला पुन्हा बसू इच्छित असलेल्या (Repeater) उमेदवारांचे दिनांक २० जुलै २०१७ पर्यंत अर्ज पाठविण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

**(ग) <u>पदोन्नती / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक</u>**

- उपसचिव संवर्गातील १ अधिकाऱ्याला सहसचिव संवर्गात, कक्ष अधिकारी संवर्गातील ४ अधिकाऱ्यांना अवर सचिव संवर्गात, सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील १ अधिकाऱ्याला कक्ष अधिकारी संवर्गात, लिपिक-टंकलेखक संवर्गातील ८० कर्मचाऱ्यांना सहायक कक्ष अधिकारी संवर्गात, उच्चश्रेणी लघुलेखक संवर्गातील १ कर्मचाऱ्याला निवडश्रेणी लघुलेखक संवर्गात, लघुटंकलेखक संवर्गातील २१ कर्मचाऱ्यांना निम्नश्रेणी लघुलेखक संवर्गात पदोन्नत्या देण्यात आल्या आहेत. ३७ उपसचिवांना पदोन्नतीचे नियमित दिनांक देण्यात आले आहेत.

**(घ) <u>बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / कार्यमुक्त</u>**

- भारतीय प्रशासन सेवेतील ७ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. कक्ष अधिकारी संवर्गातील एका अधिकाऱ्याची बदली करण्यात आली आहे. अवर सचिव व कक्ष अधिकारी संवर्गातील अनुक्रमे २ व १ अधिकाऱ्याच्या बदलीला स्थगिती देण्यात आली आहे. कक्ष अधिकारी, सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील प्रत्येकी १ अधिकारी / कर्मचारी यांच्या बदल्या रद्द करण्यात आल्या आहेत. कक्ष अधिकारी, सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील प्रत्येकी १ अधिकारी / कर्मचारी यांच्या बदल्या रद्द करण्यात आल्या आहेत. १ कक्ष अधिकारी व ३ सहायक कक्ष अधिकारी यांच्या पदस्थापनेत अंशत: बदल करण्यात आला आहे. २ उपसचिव, ४ अवर सचिव यांच्या पदस्थापना सुधारित करण्यात आल्या आहेत. सामान्य प्रशासन विभागातील एका उपसचिवाला प्रशासकीय सोयीसाठी संसदीय कार्य विभागातील उपसचिवाचा तात्पुरता अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे.

**(ङ) <u>प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन</u>**

- एका अवर सचिवाची प्रतिनियुक्ती रद्द करण्यात आली आहे.

***********